/ 363

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com


## परिपत्रक क्र.१६० दि.०९ जुलै, २०१५

विषय : भौतिक दृष्ट्या पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांचे लेखेजोखे बंद करण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या ग्रामीण योजनांपैकी सन १९९७-९८ व तद्नंतर प्रशासकीय मंजूरी प्राप्त अनेक पाणी पुरवठा योजनांची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहेत. तथापि, या योजनांचे लेखे अंतिम करण्यात आलेले नसल्याने, या योजना अपूर्ण योजना असे समजण्यात येते. अशा योजनांमध्ये प्रत्येक वर्षी वाढ होत असून यामुळे मजीप्राची प्रतिमा मलिन होत आहे.

वरील बाब विचारात घेऊन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लघु कृती आराखड्यातील "ब" वर्गातील भौतिक दृष्ट्या पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांचे लेखेजोखे तात्काळ बंद करण्याविषयी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या आढावा बैठकीत वेळोवेळी सुचना देण्यात आल्या आहेत. त्यादृष्टीने क्षेत्रिय कार्यालयांकडून कार्यवाहीही करण्यात येत आहे.

पूर्ण झालेल्या योजनांचे लेखेजोखे बंद करण्याच्या प्रकरणी गती आणण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

- कृती आराखड्यातील "ब" वर्गातील भौतिकदृष्ट्या पूर्ण योजनांचे अंतिम देयक पारीत करुन त्या योजनांचे लेखेजोखे बंद करणेची कार्यवाही हे परिपत्रक मिळाल्यापासून ६ महिन्यात पूर्ण करण्यात यावी.

- प्रत्येक अधीक्षक अभियंता यांनी त्यांच्या मंडळांतर्गत योजनांचा सविस्तर आढावा घेऊन भौतिकदृष्ट्या पूर्ण तथापि, लेखेजोखे बंद करावयाच्या आहेत अशा योजनांची निश्चित संख्या ठरवावी.

- त्याचप्रमाणे सर्व अधीक्षक अभियंता यांनी ६ महिन्यांच्या कालावधीत लेखेजोखे बंद करण्यासाठी महिनावार उद्दिष्ट ठरवून त्याप्रमाणे उद्दिष्ट साध्य करण्याविषयीचे नियोजन त्यांच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालयांना करुन देण्यात यावे. त्यानुसार महिनावार उद्दिष्टांची आकडेवारी संबंधीत मुख्य अभियंता यांच्या कार्यालयाकडे तात्काळ कळविण्यात यावी.

- मुख्य अभियंता यांनी दर १५ दिवसात या बाबतीत मंडळ कार्यालयांचा आढावा घेऊन, नियोजनाप्रमाणे कार्यवाही होत असल्याबाबत संनियंत्रण करावे.

- प्रत्येक मंडळ कार्यालयाने अशा योजनांचा प्रगती अहवाल दर महिन्यात ३ तारखेपर्यंत मुख्य अभियंता यांच्या कार्यालयाकडे सादर करावा. सर्व मुख्य अभियंता यांच्या कार्यालयांनी सदर अहवाल संकलीत करुन तो मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, ठाणे यांच्याकडे दर महिन्यात ५ तारखेपर्यंत सादर करावा. प्रगती अहवाल खालील प्रपत्रानुसार असावा.

| अ. क्र. | योजनेचे नांव | तालुका व जिल्हा | प्रशासकीय मंजूरी दिनांक | सुधारित प्रशासकीय मंजूरी असल्यास, दिनांक. | योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्याचा दिनांक. | योजनेवर झालेला खर्च (माहे/सन अखेर) | लेखेजोखे बंद करण्याचा उद्दिष्टीत दिनांक. | लेखेजोखे बंद केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

तसेच विभाग व मंडळ निहाय गोषवाराही सादर करावा.

- संचालक (वित्त) म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई यांनी लेखा अंतिम करण्यात येत असलेल्या योजनांचे वर्गीकरण व सर्व कार्यवाही योग्य प्रकारे होत असल्याची खात्री करावी. आवश्यकतेप्रमाणे क्षेत्रिय कार्यालयांना त्याबाबत मार्गदर्शन करावे.

- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा., म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे यांच्याकडे या विषयीचा प्रगती अहवाल संकलीत करुन महसूल विभाग निहाय प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत विश्लेषणासह व गोषवाऱ्यासह मा.सदस्य सचिव यांच्या अवलोकनार्थ सादर करावा. विश्लेषण खालीलप्रमाणे असावे.

| अ. क्र. | महसूल विभाग | लेखेजोखे बंद करावयाच्या एकूण योजनांची संख्या. | त्यापैकी चालू महिन्यात लेखेजोखे बंद करावयाचे एकूण उद्दिष्ट. | चालू महिन्यातील साध्य. | उर्वरीत योजनांची संख्या. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

उद्दिष्ट साध्य झाले नसल्यास त्याबाबतची कारणमिमांसा देण्यात यावी.

- लेखेजोखे बंद करण्यासाठी शासनाकडून सुधारित योजना मंजूर करुन घेण्याची आवश्यकता असल्यास, त्यासाठी क्षेत्रिय कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात यावा.
- वरीलप्रमाणे पूर्ण झालेल्या योजनांचे लेखेजोखे उद्दिष्टांप्रमाणे साध्य न झाल्यास, अशा प्रकरणांचा आढावा घेऊन, संबंधीतांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याविषयीचा प्रस्ताव मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, ठाणे यांनी मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.
- या विषयीचा प्रगती अहवाल क्षेत्रिय कार्यालये व मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, ठाणे यांनी माहे ऑगस्ट २०१५ पासून सादर करावा.

(संतोष कुमार)
**सदस्य सचिव**

**जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/ ७४७**
**दि.९.७.२०१५**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

- संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद /नागपूर / अमरावती
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे
- अधीक्षक अभियंता, गुणवत्ता परिक्षण पथक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
  *सदर परिपत्रक मजीप्राच्या Website वर Upload करावे.*
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/ औरंगाबाद/लातूर/नांदेड/नाशिक/अहमदनगर/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपूर